THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

TUESDAY, 18TH MARCH 1890.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८५९ चा १ ला, सन १८८० चा ७ वा व सन १८८३ चा ९ वा हे आक्ट सुधारण्याबाबद आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थी सन १८५९ चा आक्ट १ ला (व्यापारी लोकांच्या गलबतांवरील खलाशांविषयींचा कायदा सुधारण्याबद्दलचा), सन १८८० चा हिंदुस्तानांतील व्यापारी लोकांचे तारवांविषयींचा आक्ट आणि सन १८८३ चा हिंदुस्तानचा व्यापारी लोकांचे तारवांविषयींचा आक्ट हे यांत खालीं लिहिल्याप्रमाणें सुधारणें योग्य आहे; त्या अर्थी खालीलप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

### सन १८५९ चा आक्ट १ ला.

१. सन १८५९ चा आक्ट १ ला याच्या २४ व्या कलमानंतर, खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा; तो मजकूर येणेंप्रमाणें:—

*सन १८५९ चा आक्ट १, याच्या २४ व्या कलमानंतर नवीन कलम वाढविणें.*

"२४ अ. (१) परदेशीं जाणाऱ्या तारवावरील खलाशांबरोबर केलेला व चालू असलेला करार २३ व्या कलमाअन्वयें केला असून, हिंदुस्तानांतील ज्या जावयाच्या बंदरीं तारूं पुढील जून महिन्याच्या ३० व्या तारखेनंतर अगर पुढील डिसेंबर महिन्याच्या ३१ व्या तारखेनंतर पोंहचेल तें बंदर हिंदुस्तानांतील ज्या बंदरीं आपणास सोडून द्यावें असा खलाशांनीं करार केला असेल तें बंदर नसेल तेव्हां [तारवाचा] मास्तर, शिपिंग-मास्तराची पूर्वी मंजुरी घेऊन, अशा जावयाच्या बंदरापासून, हिंदुस्तानांतील ज्या बंदरीं आपणास सोडून द्यावें असा खलाशांनीं करार केलेला असेल त्या बंदरापर्यंत सफर करण्याचा खलाशांबरोबर नवीन करार करण्यास मुखत्यार आहे किंवा याप्रमाणें नवीन करार करण्याविषयीं त्याला फर्माविण्याचा शिपिंग-मास्तरास अधिकार आहे.

*चालू असलेला करार कित्येक प्रसंगीं नवीन करणें.*

"(२) वर सांगितल्याप्रमाणें नवीन करार करण्याविषयीं शिपिंग-मास्तरानें तारवाच्या मास्तरास फर्माविलें असून तारवाच्या मास्तरानें त्याप्रमाणें तो करार नवीन करण्याचा इनकार केल्यास, खलाशांच्या उदरपोषणासाठीं, आणि आपणास ज्या बंदरीं सोडून द्यावें असा त्यांनीं करार केला असेल त्या बंदरीं त्यांना नेण्यासाठीं सरकारास जो कोणताहि खर्च येईल तो खर्च त्या तारवावर पडेल, आणि तो सन

१८८० चा हिंदुस्तानांतील व्यापारी लोकांचे तारवांविषयींचा आक्ट याच्या ३ऱ्या बाबींतील ठरावांअन्वयें विपत्तींत आलेल्या खलाशांच्या संबंधानें झालेला खर्च असें समजून वसूल केला पाहिजे.

सन १८५९ चा आक्ट १, कलम ११५ याची सुधारणूक.

२. त्याच आक्टाच्या ११५ व्या कलमांत, "अशा प्रत्येक खलाशाबदल शंभर रुपये या दरानें आकारलेल्या रकमेबाबद" या शब्दांनंतर खालील मजकूर दाखल करावा; तो येणेंप्रमाणें:—

"आणि अशा ज्या कोणत्याहि लष्कराला किंवा इतर देशी खलाशास हिंदुस्तानाबाहेरील कोणत्याहि बंदरीं सोडिला किंवा मागें ठेविला असून तो विपत्तींत आलेला असेल आणि त्यास सन १८५४चा व्यापारी लोकांच्या तारवांविषयीं आक्ट, कलम २११, यांतील व तो आक्ट सुधारण्याबाबदच्या कायद्यांतील ठरावांअन्वयें मदत केली असेल त्या लष्कराच्या किंवा खलाशाच्या संबंधानें सरकारास जो खर्च आला असेल तो सर्व हिंदुस्तानचे सेक्रेटरी आफ् स्टेट इन् कौन्सिल यांस भरून देण्याबाबद,".

## सन १८८० चा हिंदुस्तानांतील व्यापारी लोकांचे तारवांविषयींचा आक्ट.

सन १८८० चा आक्ट ७, कलम ७४, याची सुधारणूक.

३. सन १८८० चा हिंदुस्तानांतील व्यापारी लोकांचे तारवांविषयींचा आक्ट याच्या ७४ व्या कलमांत "तारूंफूट सांपडून ती कबज्यांत घेणाऱ्या" या शब्दांनंतर "किंवा कोणतीहि तारूंफूट इतर ठिकाणीं सांपडली व कबज्यांत घेतली असून ती अशा सीमेच्या आंत आणणाऱ्या" हे शब्द दाखल करावे.

## सन १८८३ चा हिंदुस्तानचा व्यापारी लोकांच्या तारवांविषयींचा आक्ट.

सन १८८३ चा आक्ट ५ वा, याच्या ६ व्या कलमाची सुधारणूक.

४. सन १८८३ चा हिंदुस्तानचा व्यापारी लोकांच्या तारवांविषयींचा आक्ट याच्या ६ व्या कलमांत, खालील मजकूर ज्यास्त वाढवावा तो मजकूर येणेंप्रमाणें:—

"(४) या कलमांतील "किनारे" या शब्दांत खाड्यांच्या व भरतीओहटी येणाऱ्या नद्यांच्या किनाऱ्यांचा समावेश होतो.

सन १८८३ चा आक्ट ५ याच्या ७ व्या कलमांतील पोट-कलम (१) याच्या ऐवजीं नवीन पोट-कलम दाखल करणें.

५. त्याच आक्टाच्या ७ व्या कलमाचें पोट-कलम (१) याच्या ऐवजीं खालील मजकूर दाखल करावा; तो मजकूर येणेंप्रमाणें:—

तपासाचें स्पेशल कोर्ट नेमण्याचा स्थानिक सरकारचा अधिकार.

"ज्या स्थानिक सरकारास सदरील शेवटल्या कलमांत ठरविल्याप्रमाणें रिपोर्ट केला असेल किंवा खबर दिली असेल अगर ज्याच्या मुलुकांत त्याच कलमाचें पोट-कलम (१) याच्या (अ), (ब), (क) किंवा (ड) रकमेंत सांगितल्याप्रमाणें कोणत्याहि प्रकारें तोटा झाल्याबदलचे, सोडून देणें झाल्याबदलचे, खडकावर चढल्याबदलचें, नुकसानी झाल्याबदलचे किंवा अपघात झाल्याबदलचे कोणतेहि लायक साक्षीदार येऊन पोंहचले असतील किंवा मिळण्यासारखे असतील, अथवा त्याच पोट-कलमाच्या (ई) रकमेंत सांगितल्या प्रकारचा तोटा झाला आहे असें वाटत असल्याबाबदचा कोणताहि पुरावा मिळूं शकेल, त्या स्थानिक सरकारास, सदर्हू रकमांतून कोणत्याहि रकमेंत सांगितलेल्या गोष्टींचा पद्धतीप्रमाणें तपास करणें जरूर किंवा योग्य आहे असें वाटल्यास तें स्थानिक सरकार, दोहोंहून कमी नाहींत व चहूंहून अधीक नाहींत इतक्या मनुष्यांचें स्पेशल कोर्ट नेमण्यास व तो तपास करण्याविषयीं त्या कोर्टास फर्मावण्यास, आणि तो तपास करण्यासाठीं जागा ठरविण्यास मुखत्यार आहे."

६. त्याच आक्टाच्या ८ व्या कलमांत "स्थानिक सरकारानें" या शब्दांनंतर "किंवा या बाबतींत स्थानिक सरकारानें अधिकार दिला असेल त्या अमलदारानें" हे शब्द दाखल करावे.

सन १८८३ चा आक्ट ५ वा याच्या ८ व्या कलमाची सुधारणूक.

७. त्याच आक्टाच्या २० व्या कलमाची रकम (अ) व त्या कलमांतील विशेष ठराव, हीं रद्द केलीं आहेत असें समजावें.

सन १८८३ चा आक्ट ५ याच्या २० व्या कलमाची सुधारणूक.

८. त्याच आक्टाच्या २४ व्या कलमानंतर, खालील मजकूर ज्यास्त वाढवावा; तो मजकूर येणेंप्रमाणें:--

सन १८८३ चा आक्ट ५ वा याच्या २४ व्या कलमानंतर नवीन कलम जास्त घालणें.

"२४ अ. (१) या आक्टाच्या वरील ठरावांत कसाहि ठराव केलेला असला तथापि, जो दाखला (तो मग लायकीचा असो किंवा चाकरीचा असो) एकाद्या मास्तरास, मेटास किंवा एन्जिनियरास कोणत्याहि स्थानिक सरकारानें दिला असेल पण जो, सन १८६९चा व्यापारी लोकांच्या तारवांविषयींचा (कोलोनियल) आक्ट यांतील, किंवा त्या आक्टाअन्वयें कौन्सिलाच्या कोणत्याहि आर्डरींतील, ठरावांअन्वयें दिला नसेल तो दाखला, कोणतेंहि तारूं बुडालें, खडकावर चढलें किंवा सोडून दिलें किंवा त्यास नुकसानी झाली, अगर जिवाची हानि झाली ती मास्तर, मेट किंवा एंजिनियर याच्या अन्यायाच्या कृत्यानें किंवा कसुरीनें झाली असें, किंवा तो नालायक आहे अगर तो दारू पिण्याचें, जुलुमाचें किंवा दुसऱ्या गैरवर्तणुकीचें कोणतेंहि वाईट कृत्य केल्याचा दोषी आहे असें, या आक्टाअन्वयें तपास करणाऱ्या कोर्टास आढळून आल्यास, महकूफ किंवा रद्द करण्याचा त्या कोर्टास अधिकार आहे.

स्थानिक सरकारानें दिलेले दाखले महकूफ किंवा रद्द करण्याचा कोर्टास अधिकार.

"मात्र असें ठरविलें आहे कीं दाखला धारण करणारास रिपोर्टाची किंवा हकीकतीची नकल प्रसंगाप्रमाणें ९ व्या कलमाअन्वयें किंवा १० व्या कलमाअन्वयें देणें अवश्य आहे ती तपास सुरू होण्यापूर्वीं दिली नसेल तर तो दाखला कोर्टानें महकूफ किंवा रद्द करूं नये.

"(२) तपासाच्या शेवटीं किंवा त्यानंतर होईल तेवढ्या लौकर, कोणताहि दाखला महकूफ किंवा रद्द करण्याच्या संबंधानें आपण काय निकाल केला आहे तो कोर्टानें उघड बसून सांगितला पाहिजे.

"(३) ज्या मास्तराचा, मेटाचा किंवा एन्जिनियराचा दाखला कोर्टानें रद्द किंवा महकूफ केला असेल त्यानें तो दाखला, कोर्टानें मागितल्यावर, कोर्टाच्या स्वाधीन केला पाहिजे आणि तो, कलम १७, पोट-कलम (१) यावरून स्थानिक सरकारास पाठविणें अवश्य असलेल्या रिपोर्टासहित, कोर्टानें त्या सरकारास पाठविला पाहिजे.

(४) जो कोणी मास्तर, मेट किंवा एन्जिनियर पोट-कलम (३) यावरून सांगितल्याप्रमाणें दाखला स्वाधीन करण्यास चुकेल त्यास पराकाष्ठा पांचशें रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

(५) दाखला रद्द किंवा महकूफ करणाऱ्या स्थानिक सरकाराला कलमें २२, २३ व २४ यांअन्वयें दिलेलीं कामें व दिलेले अधिकार, कोर्टानें या कलमाअन्वयें एकादा दाखला रद्द किंवा महकूफ केला असेल तेव्हां, त्या कोर्टानें तो दाखला पोट-कलम (३) अन्वयें ज्या स्थानिक सरकारास पाठविला असेल त्या स्थानिक सरकारानें, अशा स्थानिक सरकारानें आपण स्वतःच तो दाखला २० व्या कलमाअन्वयें रद्द किंवा महकूफ केला आहे असें समजून, केलीं पाहिजेत व चालविले पाहिजेत."

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

१. या मसुद्याचे हेतु खालीं सांगितल्याप्रमाणें आहेत; ते येणेंप्रमाणें:—

(अ) चालू असलेल्या कराराची मुदत हिंदुस्तानांतील ज्या बंदरीं संपली असेल तें बंदर, ज्या बंदरीं आपणास सोडून द्यावें असा खलांशांनीं करार केला असेल तेंच बंदर नसेल तेव्हां, परदेशीं जाणाऱ्या तारवाच्या मास्तरास, ज्या बंदरीं सदहू कराराची मुदत संपली त्या बंदरांतील शिपिंग-मास्तराची पूर्वीं मंजुरी घेऊन, त्या बंदरापासून हिंदुस्तानांतील ज्या बंदरीं आपणास सोडून द्यावें असा खलाशांनीं करार केला असेल त्या बंदरापर्यंत सफर करण्याचा नवीन करार करण्याचा अधिकार मिळे अशा रीतीनें सन १८५९ चा आक्ट १ ला (व्यापारी लोकांच्या गलबतांवरील खलाशांविषयींचा कायदा सुधारण्याबदलचा) सुधारणें (कलम १);

(ब) परदेशीय जहाजांच्या मास्तरांनीं देशांतरीं सोडून दिलेल्या लष्करांना मदत करण्यांत आलेला खर्च सरकारास भरून देण्याबाबद त्याच आक्टाच्या ११९ व्या कलमांत ठराव करणें (कलम २);

(क) ज्या स्थलसीमेकरितां तारूंफुटींचा रिसीव्हर नेमिलेला असेल त्या सीमेच्या बाहेर सांपडलया असून त्या सीमेच्या आंत आणल्या असतील त्या सर्व तारूंफुटी व त्याप्रमाणेंच त्या सीमेंताहि सांपडलेल्या तारूंफुटी रिसीव्हराच्या स्वाधीन कराव्या असा, सन १८८० चा हिंदुस्तानचा व्यापारी लोकांच्या तारवांविषयींचा आक्ट याचें ७४ वें कलम सुधरून त्यांत ठराव करणें (कलम ३);

(ड) सन १८८३ चा हिंदुस्तानचा व्यापारी लोकांच्या तारवांविषयींचा आक्ट याच्या ६व्या कलमांतील "किनारे" या शब्दांत खाड्यांचे व भरती ओहटी येणाऱ्या नद्यांचे किनारे येतात असा खुलासा करणें (कलम ४);

(ई) एकाद्या स्थानिक सरकारच्या हुकुमतींत एकादा अपघात घडला असेल किंवा त्याबदल त्या सरकारास रिपोर्ट केला असेल त्या अपघाताची चौकशी करण्याकरितां तपासाचें कोर्ट भरण्याचा दुसऱ्या कोणत्यातरी स्थानिक सरकारास, अशा स्थानिक सरकाराच्या हुकुमतींत साक्षीदार असल्याच्या कारणानें किंवा इतर योग्य कारणासाठीं तसें कोर्ट भरणें वाजवी असेल तेव्हां, अधिकार देण्याविषयीं त्याच आक्टाच्या २ ऱ्या बाबींत ठराव करणें (कलम ५);

(फ) तारवावर घडलेल्या अपघातांचा एडन येथें तपास करण्याच्या संबंधानें त्याच आक्टाच्या ८ व्या कलमाअन्वयेंचे मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचे अधिकार त्यांनीं एडन येथील पोलिटिकल रेसिडेंटास देण्याविषयीं सदहू कलमांत ठराव करणें (कलम ६); आणि

(ग) तपासाचीं कोर्टें हल्लीं ज्याप्रमाणें बोर्ड आफ् ट्रेडचे व कोलोनियल दाखले रद्द किंवा महकूब करण्यास मुखत्यार आहेत त्याप्रमाणेंच त्यांना लायकीचे किंवा नोकरीचे स्थानिक दाखले रद्द किंवा महकूफ करण्याची, त्याच आक्टाची ३ री बाब सुधरून त्यावरून, मुखत्यारी देण्याविषयीं ठराव करणें.

२. सन १८५९ चा आक्ट १ ला यांत आणि सन १८८० चा व सन १८८३ चा हिंदुस्तानचा व्यापारी लोकांच्या तारवांविषयीं आक्ट यांमध्यें ज्या ह्या सुधारणा केल्या आहेत त्या करणें जरूर किंवा इष्ट आहे असें अनुभवावरून दिसून आल्यामुळें केल्या आहेत.

तारीख ७ फेब्रुवारी सन १८९०.

(सही) डी. बार्बोर,

(True Translation.)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.

# Bill No. I of 1890.

## सन १८९० चा मसुदा नंबर १.

### मुंबईचा म्युनिसिपालिटीच्या नोकरांबाबत आक्टाचा मसुदा.

मुंबई शहरांत व इतर जागीं, म्युनिसिपालिटीच्या ज्या विवक्षित वर्गांच्या नोकरांच्या कामांचा सार्वजनिक आरोग्याशीं अगर सुरक्षितपणाशीं संबंध असतो, त्यांच्या संबंधाचे नियम, आणि अशा नोकरांचीं कर्तव्यें, त्यांनीं काम सोडून जाणें, व त्यांनीं रजेवर जाणें यासंबंधाचे नियम, हे अमलांत आणण्याबद्दल जास्त तजवीज करणें ज्याअर्थी योग्य आहे, त्याअर्थीं खालीं दिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

लहान सरनामा.

१. (१) ह्या आक्टास मुंबईचा म्युनिसिपालिटीच्या नोकरांबाबत आक्ट असें ह्मणावें.

सुरवात व व्याप्ति.

(२) तो मुंबई शहरांत लागलाच अमलांत येईल.

(३) गव्हर्नर इन् कौन्सिल यांस, मुंबई सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन, ह्या आक्टाचे सर्व अगर कोणतेहि ठराव, सदर्हू जाहिरनाम्याच्या तारिखेनंतर निदान दोन महिन्यांनीं अगर दोन महिन्यानंतर, मुंबई इलाख्यांतील कोणत्याहि म्युनिसिपल डिस्ट्रिक्टांत लागू करण्याचा अख्त्यार आहे.

तसेच, ह्या आक्टाच्या ठरावांस अनुसरून, असा कोणताहि जाहिरनामा रद्द करण्याचा अगर त्यांत फेरफार करण्याचा त्यांस अख्त्यार आहे.

अर्थ.

२. (१) विषयास अगर संदर्भास बाध येत नसेल तर, ह्या आक्टांत योजिलेल्या सर्व शब्दांचे, सन १८८८ चा मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्ट यांत जे अर्थ दिले आहेत, ते प्रत्येकीं अर्थ होत.

हा आक्ट, अमलांत असलेल्या म्युनिसिपल आक्टांचा भाग समजून वाचावा.

(२) ह्या आक्टाचा ज्या बाबतींत मुंबई शहराशीं संबंध आहे, त्या बाबतींपुरता, तो सन १८८८ चा मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्ट याचा भाग आहे असें समजावें, आणि ज्या बाबतींत मुंबई इलाख्याच्या इतर कोणत्याहि भागाशीं त्याचा संबंध आहे, त्या बाबतींपुरता, तो, सन १८७३ व १८८४ चे मुंबईचे डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट यांचा भाग आहे असें समजावें.

निर्दिष्ट केलेल्या कामांचा राजीनामा देण्याच्या, तीं सोडून जाण्याच्या आणि त्यांत गैरहजर होण्याच्या संबंधानें अटी.

३. परिशिष्टांत नमूद केलेल्या कामांपैकीं कोणतेंहि काम करण्यासाठीं कार्पोरेशनानें अगर त्याच्या वतीनें किंवा कोणत्याहि म्युनिसिपालिटीनें अगर तिच्या वतीनें कामावर ठेविलेला जो कोणताहि म्युनिसिपल अमलदार, नोकर अगर इतर मनुष्य—

(अ) आजारामुळें अगर अपघातामुळें सदर्हू कामें बजावण्यास असमर्थ होईल असे प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, मुंबई शहरांत कमिशनराच्या लेखी परवानगीशिवाय, आणि इतर जागीं म्युनिसिपालिटीनें अशी परवानगी देण्यास अधिकार दिलेल्या अमलदाराच्या लेखी परवानगीशिवाय, त्या कमिशनरास अगर त्या अमलदारास

निदान दोन महिन्यांची लेखी नोटीस न देतां आपल्या हुद्याचा राजीनामा देईल तर; अगर

(ब) कार्पोरेशनानें अगर त्याच्या वतीनें किंवा कोणत्याहि म्युनिसिपालिटीनें अगर तिच्या वतीनें कामावर ठेविलेल्या अशा म्युनिसिपल अमलदाराच्या, नोकराच्या अगर इतर मनुष्याच्या नात्यानें, आपणास पाळावयाचा अगर मानावयाचा कायद्याचा जो कोणताहि ठराव, कानू अगर हुकूम जाणूनबुजून मोडण्याचा अगर त्याकडे दुर्लक्ष करण्याचा गुन्हा करील,

त्याचा त्यावेळीं येणें असलेल्या पगाराच्या सगळ्या बाकीवर हक्क नाहींसा होईल; आणि हा त्याचा हक्क-नाहींसा होऊन त्या वेळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याअन्वयें अगर कानूअन्वयें त्यास जी कोणतीहि इतर शिक्षा होईल तिच्या शिवाय, तो, त्यावर माजिस्ट्रेटानें अपराधाची शाबिती केल्यावर, तीन महिन्यांहून अधिक नाहीं अशी कैदेची शिक्षाहि दिली जाण्यास, अगर दंडाची शिक्षा दिली जाण्यास; अगर ह्या दोन्ही शिक्षा दिल्या जाण्यास पात्र आहे असें समजावें.

परंतु असें ठरविलें आहे कीं, असा अमलदार, नोकर अगर इतर मनुष्य, आपलीं कामें करण्यास त्यावेळीं नालायक असल्याबद्दलचा आणि ती नालायकी एक महिनाभर अगर अधिक मुदतीपर्यंत चालण्याचा संभव आहे अशाबद्दलचा, मुंबई शहरांत कमिशनरानें आणि इतर जागीं म्युनिसिपालिटीनें नेमिलेल्या वैद्यकीय अमलदाराच्या सहीचा दाखला सादर करील, तर, राजीनामा देण्यास लागणारी परवानगी त्यास तात्काळ दिली पाहिजे.

शिवाय आणखी असें ठरविलें आहे कीं, पूर्वोक्त दाखल्याबद्दल अगर त्यासंबंधाच्या परीक्षेबद्दल कोणत्याहि मनुष्याकडून फी मुळींच घेऊं नये.

दोन महिन्यांची नोटीस न मागण्याचा अगर राजीनामा रुजू केल्यानंतर नोकरींतून मोकळें करण्याचा अधिकार.

४. (१) कलम ३ (अ) यांत सांगितलेली राजीनामा देण्याची परवानगी देण्यास योग्य रीतीनें अधिकार दिलेल्या कोणत्याहि मनुष्यास,

(अ) योग्य वाटल्यास राजीनाम्याच्या तारिखेपासून दोन महिन्यांच्या आंत अमलांत येणारा राजीनामा, मंजूर करण्याचा अखत्यार आहे; अगर

(ब) सदरीं सांगितल्याप्रमाणें कामावर ठेविलेल्या कोणत्याहि म्युनिसिपल अमलदारानें, नोकरानें अगर इतर मनुष्यानें आपला राजीनामा रुजू केल्यानंतर कोणत्याहि वेळीं त्या अमलदारास, नोकरास अगर मनुष्यास नोकरींतून मोकळा करण्याचा अखत्यार आहे.

(२) पोट-कलम १, रकम (ब) अन्वयें नोकरींतून मोकळा केलेल्या अशा कोणत्याहि अमलदारास, नोकरास अगर इतर मनुष्यास, तो व कार्पोरेशन अगर कार्पोरेशनचा मुखत्यार किंवा म्युनिसिपालिटी अगर तिचा मुखत्यार यांच्या दरमियान झालेला कोणताहि पूर्वीच्या करारास अनुसरून, राजीनामा रुजू करण्याचे तारिखेपर्यंत लागू झालेल्या पगाराशिवाय, आणखी पंधरा दिवसांचा अगर राजीनामा रुजू केल्यानंतर यासंबंधानें अधिकार असलेला अमलदार १५ दिवसांपेक्षां जितक्या जास्त मुदतीपर्यंत त्यास कामावर ठेवील तितक्या मुदतीचा पगार मिळण्याचा हक्क आहे.

परिशिष्टांत अधिक मजकूर घालण्याचा गव्हर्नर इन कौन्सिल यांचा अधिकार.

५. (१) गव्हर्नर इन कौन्सिल यांस, मुंबई सरकारी गॅझेटांत वेळोवेळीं जाहिरनामा देऊन, सार्वजनिक आरोग्याशीं अगर सुरक्षितपणाशीं कामांच्या ज्या विवक्षित वर्गाचा संबंध आहे तो वर्ग त्या जाहिरनाम्यांत ठरविलेल्या व दोन महिन्यांच्या

आंतली नाहीं अशा कोणत्याहि तारिखेपासून ह्या आक्टाच्या परिशिष्टांत सामील केला आहे असें समजावें असें प्रसिद्ध करण्याचा कायदेशीर अधिकार आहे; आणि त्या जाहिरनाम्यांत नमुद केलेल्या प्रकारचें कोणतेंहि काम करण्यासाठीं कार्पोरेशनानें अगर त्याच्या वतीनें किंवा कोणत्याहि म्युनिसिपालिटीनें किंवा तिच्या वतीनें लाविलेल्या सर्व मनुष्यांस कलम ३ याचे ठराव त्या जाहिरनाम्यांत यासंबंधानें ठरविलेल्या तारिखेपासून लागू करण्यांत येतील.

(२) गव्हर्नर इन् कौन्सिल यांस, गेल्या शेवटल्या रकमेस आणि ह्या आक्टांतलि इतर ठरावांस अनुसरून असा कोणताहि जाहिरनामा रद्द करण्याचा अगर त्यांत फेरफार करण्याचा आणि कोणताहि जाहिरनामा हा आक्ट लागू असलेल्या कोणत्याहि विवक्षित म्युनिसिपालिटीस अगर जागेसच लागू करण्याचा अख्त्यार आहे.

नोकरांस आक्टाच्या प्रती थोड्या किंमतीनें देणें.

६. विवक्षित काळीं अमलांत असलेल्या परिशिष्टांत निर्दिष्ट केलेल्या कामांपैकीं कोणतेंहि काम करण्यासाठीं कार्पोरेशनानें अगर त्याच्या वतीनें किंवा कोणत्याहि म्युनिसिपालिटीनें अगर तिच्या वतीनें कामावर ठेविलेल्या प्रत्येक मनुष्यास, एक आणा दिल्यानें, मुंबई शहरांत मुंबई शहाराच्या म्युनिसिपल कमिशनराकडून आणि इतर ठिकाणीं म्युनिसिपालिटीच्या प्रेसिडेंटाकडून इंग्रजी, मराठी, गुजराती, कानडी अगर सिंधी भाषेंतली या आक्टाची आणि त्या आक्टाअन्वयें केलेल्या जाहिरनाम्यांपैकीं जे त्या मनुष्यास अगर तो ज्या वर्गापैकीं असेल त्यास लागू असतील त्यांची एक प्रत मिळण्याचा अधिकार प्राप्त होतो.

---

## परिशिष्ट.

### (कलम ३ पाहा.)

**जीं कामें करण्यासाठीं कार्पोरेशनानें अगर त्याच्या वतीनें किंवा कोणत्याहि म्युनिसिपालिटीनें अगर तिच्या वतीनें लाविलेल्या मनुष्यांस कलम ३ याचे ठराव लागू होतात तीं कामें.**

वर्ग १. सार्वजनिक आरोग्याच्या संबंधाचीं कामें:

(अ) रस्ते अगर घरांच्या आसपासच्या जागा यावरील मैल काढून नेणें अगर ते साफ करणें,

(ब) मोऱ्या साफ करणें अगर धुणें,

(क) घरांतून, पायखान्यांतून, शेतखान्यांतून, मुत्र्यांतून अगर डबक्यांतून नरक अगर घाणीचा पदार्थ काढून नेणें; अगर सदर्हू काढून नेलेल्या पदार्थांची व्यवस्था लावणें,

(ड) जनावरांचीं प्रेतें नेणें,

(इ) साधारणतः, घाण न होऊं देणें.

वर्ग २. सार्वजनिक सुरक्षितपणाच्या संबंधाचीं कामें :

(अ) फायर ब्रिग्रेडांतल्या इसमांचीं कामें.

(ब) कोणतेंहि म्युनिसिपल पाण्याचें काम, पाट, पंपिंग स्टेशन, अगर फायर हैड्रन्ट यांच्या मरामतीवर अगर त्यांचें काम चालविण्याकरितां किंवा त्यांच्या मरामतीच्या अगर काम चालविण्याच्या संबंधानें लाविलेल्या कोणत्याहि हुद्याच्या,

(१) इन्स्पेक्टर,

(२) सब्-इन्स्पेक्टर,

(३) फोरमेन,

(४) कारागीर,

(५) ड्रायव्हर,

(६) पाहारेकरी,

(७) मजूर,

(८) कामकरी,

वगैरे लोकांचीं कामें.

(क) दिवे लावणारांचीं कामें.

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

सन १८७२ चा मुंबईच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्ट रद्द होऊन, त्याचें कलम २६७ (अ) यांतलि ठराव सध्याचा सन १८८८ चा जो मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्ट त्यांत सामील करण्यांत न आल्यामुळें हा मसुदा सादर करावा लागला आहे.

२. त्या पोट-कलमावरून 'कार्पोरेशनाच्या अमलदारांनीं व नोकरांनीं आपापलीं निरनिराळीं कामें नियमितपणें, बिनचूक रीतीनें व इमानानें करण्याविषयीं' पोट-कानू करण्याचा अधिकार होता. सन १८७२ चा मुंबईचा आक्ट ३ हा रद्द होण्याच्या आधीं, जरूर मंजुरीनिशीं केलेला पोट-कानू नंबर ९ हा अमलांत होता; या पोट-कानूवरून, जे विवक्षित म्युनिसिपल नोकर आपलें काम परवानगी मिळाल्याशिवाय सोडून जात त्यांना शिक्षा देतां येत असे.

३. असे पोट-कानू करण्याचा अधिकार सध्याच्या आक्टांत चालू ठेविलेला नाहीं; व सरकारास असें कळविण्यांत आलें आहे कीं, या कारणावरून सदरील पोट-कानू आतां अमलांत नाहीं.

४. या मसुद्याचा मुख्य उद्देश, कोणताहि नवीन नियम दाखल करावयाचा नसून, आजपावेतों म्युनिसिपल पोट-कानूंअन्वयें जी शिक्षा देण्यांत येत असे ती कायद्यानें ठरवावी, हा आहे. या मसुद्यांतल्या शिक्षेचे ठराव, ज्या वर्गाच्या नोकरांच्या कामांचा सार्वजनिक आरोग्याशीं अगर सुरक्षितपणाशीं निकट संबंध असतो, त्या वर्गाच्या नोकरांस मात्र लागू आहेत हें लक्षांत येईल.

५. मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्टाच्या ३६५ व्या कलमाअन्वयें, मुंबई शहराचा पृष्ठभाग साफ करण्याची तजवीज करणें कमिशनरास भाग आहे, आणि कलम ३७१ अन्वयें, हलालखोरांस कामावर ठेवण्यास म्युनिसिपालिटीस मात्र अधिकार आहे. अशी स्थिति असल्यामुळें, मुंबईच्या रहिवासी लोकांस या बाबतींत सर्वस्वीं म्युनिसिपालिटीवर अवलंबून राहावें लागतें; आणि म्युनिसिपालिटीच्या व्यवस्थेंत एक आठवडाभर जर घोंटाळा झाला, तर परिणाम फार वाईट होईल आणि एकादी भयंकर सांतही उद्भवेल हें, ज्यांस मुंबइची माहिती आहे त्यांस ठाऊक आहे. ह्मणून, सध्याच्या म्युनिसिपल आक्टाच्या ६४ (३) (क) आणि ४३४ या कलमांअन्वयें म्युनिसिपालिटीच्या काम बजावणाऱ्या अमलदारांस जे विस्तृत अधिकार दिलेले आहेत, त्या अधिकारामुळेंच हा योजिलेला कायदा करावा लागत आहे असें म्हटलें पाहिजे.

६. त्याप्रमाणेंच, फायर-ब्रिगेडच्या लोकांस अगदीं निकडीच्यावेळीं, आपलीं कामें कांहीं शिक्षा न होतां सोडतां येत असलीं तर लोकांच्या जीवांस तितकाच धोका येण्याची भीति आहे.

नुकतेंच कांहीं दिवसांपूर्वीं मुंबई शहरच्या फायर ब्रिग्रेडचे लोक पोलिसांपैकीं असत ; आणि साधारण पोलीस फौजेचा भाग या नात्यानें त्यांस जो कायदा लागू असे, त्याच्या योगानें त्यांचीं कामें, त्यांनीं योग्य रीतीनें बजावण्याबद्दल त्यांवर बंधन असे. सन १८८८ चा मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्ट याच्या ३९९ व्या कलमावरून, "आग विझविणें, आणि आग लागली असतां जीव व मालमिळकत बचाविणें." हें कार्पोरेशनचें काम आहे आणि तें काम बजावण्यास लागणारीं साधनें आतां कमिशनराच्या ताब्यांत आलीं आहेत. तथापि, फायर ब्रिगेडच्या लोकांनीं कर्तव्यभंग अगर कामाची हयगय केली असतां शिक्षा देण्याबद्दल त्या आक्टांत ठराव मुळींच नाहीं.

७. फायर ब्रिगेडचें काम मुख्यत्वें करून पाण्याच्या पुरवठ्यावर अवलंबून असतें; आणि तो पुरवठा बंद झाला तर ती ब्रिगेड बहुतेक अंशीं निरुपयोगी होते. शिवाय, पाण्याच्या कामांच्या मरामतीसंबंधाची अगर त्यांचें काम चालविण्याच्या संबंधाचीं कामें सोडून दिल्यानें अगर त्यांबाबद हयगय करण्यांत आल्यानें सगळ्या शहरच्या आरोग्यास व त्याचप्रमाणें सुरक्षितपणास धोका येण्याचा संभव आहे.

८. शहरांतले दिवे लावण्याशीं ही सार्वजनिक सुरक्षितपणाचा संबंध आहे. आणि आपलें काम करण्याचें नाकारून सगळ्या शहरास अगर त्याच्या कोणत्याहि भागास अंधेरांत ठेवण्याचें दिवे लावणाऱ्यांच्या हातांत ठेविलें असतां भयंकर परिणाम होण्याचा संभव आहे.

९. ह्मणून, या सर्व गोष्टींवरून हें स्पष्ट होत आहे कीं सदरील पोट-कानू रद्द झाल्यामुळें जो बचाव नाहींसा झाला आहे तो कायद्यानें अमलांत आणिला पाहिजे.

१०. या यादींत ( मसुद्यास जोडलेलें परिशिष्ट पाहा ) आणखी कामें सामील करणें जरूर आहे असें यापुढें अनुभवावरून दिसून येण्याचा संभव असल्यामुळें, गव्हर्नर इन् कौन्सिल यांस, अगोदर योग्य सूचना करून, जाहिरनाम्यानें सार्वजनिक आरोग्य अगर सुरक्षितपणा यांच्या संबंधाच्या कोणत्याहि कामांच्या वर्गास हा मसुदा लागू करण्याचा अधिकार द्यावा असें योजिलें आहे. नोटीस द्यावयाची ती, ज्या कोणत्याहि मनुष्यास त्या अटी कबूल नसतील त्यास नोकरींतून निघण्याची सवड देण्यापुरती अगोदर दिली पाहिजे.

११. अगोदर योग्य सूचना केल्यानंतर इलाक्यांतल्या कोणत्याहि म्युनिसिपल डिस्ट्रिक्टास हा मसुदा लागू करण्याबद्दल दुसऱ्या कलमांत ठराव केला आहे.

१२. ज्या कामांची जाणूनबुजून हयगय केल्याबद्दल अगर जें काम जाणूनबुजून सोडल्याबद्दल त्या कामांवर लाविलेले मनुष्य अमुक शिक्षेस पात्र असावे असें या मसुद्यांत योजिलें आहे, त्या मनुष्यांस आपल्या पात्रतेबद्दल पूर्ण सूचना असावी याकरितां अशा लोकांस ह्या आक्टाच्या प्रती क्षुल्लक किंमतीस मिळाव्या असा ह्या मसुद्यांत ठराव केला आहे.

(सही) आर. वेस्ट.

तारीख ६ माहे मार्च सन १८९०.

अलीजा बहादुर गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

जे. जे. हीटन,

मुंबईच्या गव्हर्नरांचें कायदे व कानू करणारें

कौन्सिल याचे सेक्रेटरी.

तारीख ६ माहे मार्च सन १८९०.

(True Translation.)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.



BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.